**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** – तेजस शिवाजी कुराडे.

**वय** – ३४ वर्ष, **व्यवसाय** - शेती व खाजगी नोकरी,

**राहणार**– आंबाडे, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरतपास– श्रीमती. एस. आर. पाटील, सरकारी वकील.**

**१.** दि.०७.०१.२०२४ रोजी पोलिसांनी मला फिर्यादीच्या घरासमोरील आंबाडे ते खेडगे पाणंद रस्त्यावरती पंचनाम्यासाठी बोलावले होते. त्या ठिकाणी मी, फिर्यादी, दुसरा पंच आनंदा मालव आणि पोलिस कर्मचारी हजर होतो. त्यावेळी फिर्यादीचे घरचे लोक देखील हजर होते. पोलिसांना फिर्यादीने घडलेली घटना सांगितली होती. फिर्यादीला आरोपींनी मेसकाठीने डाव्या मांडीवर आणि डाव्या हाताच्या अंगठयावर मारले होते. त्यानंतर पोलिसांनी आम्हाला घटना घडलेल्या ठिकाणी नेले होते. फिर्यादीने सांगितलेली घटना त्याच्या घराच्या पश्चिमेला ८० फूट आणि दुसरा पंच आनंदा मालव याच्या घरापासून दक्षिणेला ५० फूट अंतरावरती घडलेली होती. आम्हाला घटनास्थळी गेल्यावर एक ५४ इंच लांबीचा तीन गाठी असलेला मेसकाठीचा दांडा सदर ठिकाणी पडलेला दिसला होता. फिर्यादीने त्याला आरोपींनी त्याच दांडयाने मारहाण केल्याचे सांगितले होते.

२. पोलिसांनी तो दांडा आमच्या समक्ष जप्त करुन त्यावरती आमच्या स्वाक्षरीचा एक कागद चिकटवला होता. मला तो लाकडी दांडा दाखवल्यास ओळखता येऊ शकतो. आता मला वस्तू क्र.अ वरील लाकडी दांडा दाखवला, त्यावरती माझी स्वाक्षरी केलेला कागद चिकवटवलेला असून तो तोच आहे. त्यानंतर पोलिसांनी फिर्यादीने दाखवलेल्या जागेच्या चतुःसिमा नोंदवल्या होत्या. त्या जागेच्या दक्षिणेला सरकारी मुलकी पडाची जागा, उत्तरेला आनंदा मालव याचे घर आणि पुर्व–पश्चिम आंबाडे ते खेडगे रस्ता आहे. त्या रस्त्यापासून दक्षिण बाजूला ८५ फूटावरती एक इलेक्ट्रीक पोल असून दोन्ही बाजूला जंगली झाडे आहेत. पोलिसांनी त्याबाबतचा लेखी पंचनामा करुन त्यावरती आमच्या स्वाक्ष–या घेतल्या होत्या. पोलिसांनी तो पंचनामा १२.४५ वाजता चालू करुन १.३० ते १.४५ वाजेच्या दरम्यान पुर्ण केला होता. आता मला तो घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखवला. त्यावरती माझी स्वाक्षरी असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि. क्र. पी.३१** देण्यात येतो.

नि. क्र. ३०.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपीतर्फे उलटतपास – श्री. के. जी. पाटील वकील.</u>**

**३.** आरोपी हजर, वकील गैरहजर. आरोपींनी दिलेल्या मुदतीच्या अर्जावरुन उलट तपास पुढील तारखे पर्यंत तहकूब.

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – २१.०५.२०२६. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते